International Research Journal ISSN-0975-3486 RNI : RAJBIL 01488 VOL. I * ISSUE—2

Oct-Nov—2009

शोध पत्र- इतिहास

# मोगलकालीन महसूल पद्धतीत शेतकयांची स्थिति

*डॉ. शारदा बडे

*इतिहास विभाग प्रमुख, स्वा.सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा, परभणी

अठराव्या

अठराव्या शतकाच्या सुरूवातीच्या वर्षात मोगल साम्राज्याच्या प्रादेशिक विस्ताराची परिसीमा गाठली गेली, परंतु औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या थोड्याच दशकात साम्राज्य कोसळू लागले. देशात घडलेल्या राजकीय घटना, पक्षोपक्षांची आणि समूहांची दरबारातील भांडणे, कारभार पद्धतीचा दुबळेपणा, सामर्थ्यवान सरदार वर्ग, सरदार वर्गाच्या संघर्षामूळे शाही दरबार कारस्थाने, महसूल पद्धतीत शेतकयांची दशा ही सर्व कारणे साम्राज्य मोडकळीस येण्यास कारणीभूत ठरली. भारतातील खेड्यांचा व खेड्यातील लोकांचा, शेती करणाया शेतकयांचा इतिहास समजून घेतल्या शिवाय भारतीयांचा इतिहास पूर्ण होणार नाही.

**शेतकरी :-**उपलब्ध साधनांच्या सहाय्याने शेतकयांच्या स्थिती संबंधीच्या विचाराधीन असलेल्या गोष्टीशी खरोखरच संबंधीत असलेल्या पुराव्याचे परिक्षण करण्यापुर्वी शेतकरी या शब्दाचा निश्चित अर्थ काय लावणार आहोत हे स्पष्ट करणे उपयक्त ठरेल. शेतकरी म्हणजे मालकीचे हक्क असोत नसोत जमिनीची मशागत करणारा आणि ती जमीन विकणे किंवा गहाण टाकणे याचे अधिकार नसणारा, इराणी बखरीतून आणि कागदपत्रातून अशा शेतकयांना माजरा, असामी किंवा राया म्हणत. [१] शेतकरी आणि शेती करणारे जमीनदार दोघेही जमिनीची मशागत करीत परंतु दोहोंत एक महत्वाचा फरक असे, यातील एका वर्गाला आपल्या जमिनीवर वंशपरंपरागत व बदलता येण्यासारखे हक्क व हितसंबंध असत. दुसरा वर्ग असे हक्क दाखवू शकत नसे. इतकेच नव्हे तर खुद्द त्यांच्या मालकीच्या हक्का बद्दलही वाद निर्माण होई.

सर्वधारणपणे रयती खेड्यामधे जमिनीचा महसूल देण्यासाठी जमीनदारालाच कामावर ठेवीत असत आणि सरकारी अधिकारी प्रत्यक्षपणे शेतकयांशी व्यक्तिशः संबंध ठेवीत नसत. दस्तूर-उल-अमल-ई-बेकस यात दिलेल्या भाडेपट्ट्यावरुन असे दिसते की, मुकादम किंवा जमीनदार जमीन महसूलासाठी नेमला जात असे. [१] दिवाण-इ-पसंद हा लेखक सांगतो की, प्रत्येक खेड्यात अनेक मुकादम किंवा मालीक असत आणि यांच्या हाताखाली शेकडोंनी असामी किंवा माजरा असते, हे आसामी जमिनीची मशागत करीत आणि मुकादमाच्या तर्फे सरकारला जमीन महसूल ठरविण्याची सर्वसाधारण पद्धत होती व या पद्धतीला जामा-ई-मुशखरवस असे म्हणत. या वेळी जमीनदार करार करण्यास कांही कारणाने नाकारत असे त्यावेळी सारा ठरविलेल्या जमिनीवर शेतकयाकडून जमाबंदीच्या नावाखाली प्रत्यक्षपणे पैसा गोळा करीत. या पद्धतीला अमल-इ-खास असे म्हणत.[४] अशा रितीने सरकार आणि शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध सहसा प्रस्थापित होत नसे. जमीनदार व शेतकरी यांच्यातील संबंध सरकारने घालून दिलेल्या नियमानुसार चालत. या नियमांचे व निर्बंधांचे निरीक्षण केल्यानंतर जमीनदार व शेतकरी यांच्या संबंधावर प्रकाश पडतो. तसेच जमिनीच बाबतीत शेतकयांना कोणते हक्क आहेत याचेही स्वरुप कळते.

**शेतकयांचे हक्क :-**जमिनी गहाण टाकणे-विकणे हे शेतकयांचे हक्क नसत. उपलब्ध पुराव्यावरुन तरी असे हक्क दिसत नाहीत. तरीही संशोधनात दस्तूर-उल-अमल-ई-बेकस यात एक मुचलका किंवा करार दिला आहे. तो करार मुकादम किंवा जमीनदार पाळीत नसत व त्यामूळे या मुद्यावर चांगलाच प्रकाश पडतो त्यामूळेच जमीनदार व शेतकरी यांच्या संबंधीच्या अंतरंगाचे ज्ञान आपणाला होते आणि परस्परांच्या आवडी व हक्क यांचीही स्पष्ट कल्पना येते. १) विशिष्ट काळापुरता जमीनदारांनी ठरविलेल्या रकमेतील जामा नावाचा भाग उभ्या पिकांवरुन ठरवून वापरला जाई. तसेच प्रत्येक शेतकयाकडून ठरलेला जामा ते त्याच्या नावावर पिकाचे जे क्षेत्र दाखवले असेल त्याप्रमाणे घेतील. [५] २) प्रत्येक बिघ्यावरील जमीन महसूल सोडून दुसरे कांहीही ते गोळा करणार नाहीत. ३) कुठल्याही शेतकयावर ते खेडे सोडून जाण्याची पाळी आणणार नाहीत. ४) ठरलेल्या महसुला वाचून स्वतःचे शेत नांगरण्यासाठी म्हणून ते जादा पैसे घेणार नाहीत. ५) ते रयतेला नष्ट करणार नाहीत. या करारात मुख्यतः शेतीविषयक संबंधाचे तीन पैलू स्पष्ट झाले. उदा- महसूल ठरवीणे व गोळा करणे, शेतकयांचे वहिवाटीचे हक्क व जमीनदारांचे नौकरांकडून व्यक्तिगत काम करुन घेण्याचे सरंजामी बंधन. कराराचा नाममात्र विचार केला तर १८ व्या शतकाच्या सुरूवातीस शेतकरी अगतिक व जमीनदाराची इच्छा असे तोपर्यंत कुळ म्हणून नव्हते असे उत्तर दिसते. कांही अटी ठरवून शेतीची मशागत करणारे शेतकरी असत अधिकारी शेतकयांचा महसूल ठरवीत व त्याने किती पैसे भरावयाचे हे कर-आकारणीच्या

हिशेब पुस्तकात दाखवित. जमीनदारांचे हक्क हिशोबात दाखविल्याप्रमाणे जमिन महसूल गोळा करण्याशी संबंधीत असत. ठरल्या महसूलापेक्षा त्यांनी अधिक घेवू नये असा दंडक असे. त्याचा दुसरा अर्थ जमीन महसूल ठरविणे व गोळा करणे या कामात केलेले विभाजन शेतकयांचे हक्क राखण्यास उपयोगी पडते. शेतकरी जरी खेड्यातून अनुपस्थित राहीला तरी त्याचे शेतावरील हक्क वस्तुतः अबाधित असत. हे शेतकरी कांही काळाने परत येणार असतील तरच हे चालत असे. [८] आपल्या हक्कासाठी शेतकरी जागृत असून ते आपले हक्क अमलात आणण्यासाठी अधिकायांना भेटत असत. जमीनदारांच्या परंपरागत हक्कासंबंधी सरकारला पुर्ण माहिती होती व हे जमीनदार या हक्कांची पायमल्ली करुन शेतकयावर जुलूम करीत असेही आपण अनुमान करु शकतो. अशा तहेचे करार जमीनदारांनी [९] कोणताही अतिरेक करु नये म्हणून उपयोगी पडत.

**शेतकरी व जमीनदार :-**शेतकयाने जमीनदाराची कांही व्यक्तीगत सेवा करावी असा एक रिवाज होता. ही सेवा विनामूल्य ठरविलेली असे व तिची मर्यादा स्थानिक रितिरिवाजानुसार ठरविली जाई. जमीनदाराचे स्थानिक पूर्वज व त्यांची कुळे यांचे एकमेकांशी संबंध सरंजामशाही पद्धतीत ठरविले जात होते. १८ व्या शतकातील भारतीय किसान हा व्यक्तिशः स्वतंत्र असून कांही अटीच्यावर तो जमीनीची मशागत करी व उत्पन्नातील कांही भाग जमीनदारांच्या तर्फे सरकारला देई, हे आपण मानू शकतो. अटी व करार ज्यात लिहीले जात त्या दस्तऐवजाला जो जमीनदाराच्याकडून शेतकयांना दिला जाई त्यास पट्टा म्हणत. महादी अलीखान याच्या दस्तूर-उल-अमल वरुन आपल्याला कळते की, जमीनदार व जमिन महसूलासाठी नेमलेले वसूलीचे शेतकरी यांना जमिन वसूलीसाठी असा पट्टा लिहून द्यावा लागे व त्यात महसूलाची रक्कम, ती ठरवीण्याची पद्धत उदा- नगदी की वसूली सांगावे लागे व ठरलेल्या रकमेपेक्षा आम्ही अधिक घेणार नाही अशी हमी द्यावी लागे. [१०] शेतकरी जी जमिन महसूल म्हणून रक्कम रक्कम देत त्याबद्दल त्यांना पावतीही दिली जात असे, असे दिसते. ही पावती पटवारी [११] देई, औंध प्रांता संबंधी असलेल्या दस्तऐवजात कांही भागात अशा तहेच्या करारात अटी व बंधने लिहीली जात त्या संबंधीचा पुरावा मिळालेला आहे.

**शेतकयांचे स्थान :-**खेड्यात शेतकयांची काय स्थिती असे ती थोडक्यात सांगता येईल. सरकार आणि शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध आढळत नव्हते, कारण जमिन महसुलीसाठी जमीनदार शेतकयांची भरती करी. तरी ज्या ठिकाणी जमीनदार वसूली करण्यास नकार देत त्या ठिकाणी शेतकयांकडून प्रत्यक्ष वसूली केली जाई. प्रत्येक शेतकयाकडून काय सारा घ्यायचा ते सरकारी अधिकारी ठरवीत. पण जमिनीवरील महसूल मात्र जमीनदार गोळा करीत. पण यातही भिन्नता नव्हती असे नाही. कांही ठिकाणी व्यक्तीगत शेतकयांकडून काय महसूल घ्यायचा हे शेतकरी व जमीनदार आपसात ठरवीत. यावरुन शेतकयांना विकायचा किंवा गहाण टाकायचा अधिकार नसे. जमीनदारांच्या मर्जीनुसार जमिनीची मशागत करीत, जमीनदार त्यांना केंव्हाही काढु शकत असे. प्रत्यक्षपणे शेतकयांचे दर्जे व वर्ग पडत आणि आर्थिक परिस्थिती स्थलानुरुप बदलत असे.

**शेतकयांची परिस्थिती :-**१८ व्या शतकाच्या पुर्वार्धात शेतकयांची काय स्थिती होती हे आपण पाहू. जमीन महसूलाच्या मागणीची मर्यादा काय याची सर्वसाधारणपणे जमिनीचा कस असेल त्याप्रमाणे एकंदर पिकाच्या १/३ ते १/२ पर्यंत महसूल किसानाला द्यावा लागे. हा कस स्थळानुरुप बदलत असे. शेतकयांकडून जमिन महसूलाच्या [१२] मागणीच्या (माल) वर कांही कर व कांही भत्ते जमिन महसूल ठरविणे आणि गोळा करणे याचा खर्च भागविण्यासाठी निरनिराळ्या रुपाने घेतले जात असे. तलबाना किंवा शहनागी यासारखे कर जमीनदारांच्याकडून वसूल केले जात आणि जमीनदार ते करांचे ओझे शेतकयांवर सारुन देत. कानुंगो आणि चौधरी यांना मिळणारी दलालीही रयतेकडून वसूल केली जाई. एका सरकारमधील कानुंगोला रयतेच्या उत्पन्नाच्या २ टक्के आणि चौधरीला करांच्या १ टक्का एवढीच दलाली [१३] मिळण्यास तो पात्र असे, असे सांगीतले जाते. शिवाय कारभार विषयक स्थितीचा त्याकाळी शेतकरी समाजावर विशेषतः शेती करणायावर उलट परिणाम झालेला होता.

रयत विभागातील शेतकयावर जबरदस्त कर होते आणि त्यांच्यावर जुलूमही फार होत होते. इजाराच्या सर्वत्र असलेल्या पद्धतीने शेतकयावर असाच प्रतिकूल परिणाम घडवलेला आहे. साधारणपणे या काळात कारभारविषयक स्थिरता नव्हती आणि ही शेतकयांना हितकारक नव्हती. सामान्यतः रोजच्या भाकरीची त्याला ददातच असे. सामान्य शेतकयांच्या सरासरी उत्पन्नाची निश्चित कल्पना करणे कठीण आहे. हे कित्येक घटकावर अवलंबून असते.

शेतकयांची जात, खेड्याची पद्धती तसेच खेड्यातील जमीनदार व बाजूच्या खेड्यात राहतो व जिच्या बद्दल प्रश्न आहे अशी खेड्यातील सर्व जमिन शेतमजुरांच्याकडून कसली जाणे, जमिनीच्या दबावाने प्रत्येकाच्या मालकीची जमीन व अमीलचा प्रामाणिकपणा, प्रादेशिक स्तरावर या मुद्यावर संशोधन केले पाहिजे, मगच शेतकयांच्या परिस्थितीवर निश्चित निष्कर्ष आपण काढू शकतो.

**निष्कर्ष :-** अशा प्रकारे शेतकयांच्या स्थितीचा अभ्यास केला असता, कांही कुठलाही असो पण शेतकयांच्या जीवावरच सगळे जगणारे होते. पण त्याच्या तळमळीच्या कष्टाची कधी किंमतच केलेली नाही असे दिसून येते म्हणूनच आजही बळीराजा उघड्यावरच दिसतो.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) मोगलकालीन महसूल पद्धती - एन.ए.सिद्दीकी -२००६, डायमंड पब्लिकेशन्स, सदाशिवपेठ, टिळक रोड, पूणे. २) मध्ययुगीन भारताचा इतिहास - डॉ.श.गो.कोलारकर -१९८८, मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर. ३) दस्तूर-उल-अमल-इ-अलमगीरी - पृष्ठ ४१ वे. ४) दस्तूर-उल-अमल-इ-बेकस - पृष्ठ ६७ A - ८६ B. ५) दिवाण-इ-पसंद - पृष्ठ ७ B. ६) दस्तूर-उल-अमल-नाहिद-अलिबान - पृष्ठ ८B. ७) दस्तूर-उल-अमल-इ-बेकस - पृष्ठ ६६ AB. ८) उपरोक्त - पृष्ठ ६८ AB. ९) उपरोक्त - पृष्ठ ४२ - ४४ A.